आरोग्य सेवा

जा.क्र./आमाजीआ/कक्ष-८३/जन्म नोंदी/०३
राज्य आरोग्य माहिती व जीवनविषयक
आकडेवारी केंद्र, विश्रांतवाडी पोलीस
स्टेशन समोर, येरवडा, पुणे - ४११ ००६.
दिनांक :- ४ मे, १९९९

प्रति,
जिल्हा आरोग्य अधिकारी,
तथा जिल्हा निबंधक जन्म-मृत्य,
जिल्हा परिषद, [सर्व]

**विषय :- १/४/१९७० पूर्वी झालेल्या जन्म किंवा मृत्यु घटनांची नोंद करण्याबाबत.**

काही शहरी व ग्रामीण निबंधक जन्म-मृत्यु नोंदणी या कार्यालयास पत्र लिहून अशी शंका व्यक्त केली आहे की, दिनांक ११/४/७० पूर्वी ज्या जन्म-मृत्यु नोंदणीच्या घटना घडल्या आहेत, त्याची नोंद कायद्यानुसार करता येते किंवा नाही, वास्तविक ही शंका दिनांक २१/२/७८ च्या पत्राबरोबर जोडलेल्या मार्गदर्शकीमूळे उपस्थित झालेली असावी. परंतू या कार्यालयात वारंवार खुलासा करुन देखील या संबंधी शंका निर्माण करण्यांत येत आहेत. याकरिता पुन्हा एकदा कायद्यातील तरतुदी लक्षात घेऊन तसेच वरिष्ठांचे आदेश प्राप्त करुन घेऊन त्याबाबत खालिलप्रमाणे खुलासा करण्यात येत आहे.

जन्म-मृत्यु नोंदणीनियम १९६९ मधील कलम १३ (३) नुसार व महाराष्ट्र राज्य जन्म-मृत्यु नोंदणी नियम १९७६ मधील नियम १० (३) नुसार जन्म मृत्यु ची घटना घडल्यानंतर एक वर्ष कालावधी पूर्ण झालेला असेल व त्या नंतर त्याची नोंद जर संबंधीत निबंधकाकडे करुन घेऊन प्रमाणपत्र मिळवावयाचे असेल तर संबंधीत व्यक्तीने संबंधीत कार्यक्षेत्रातील कार्यकारी दंडाधिकारी यांचे आदेश पत्र प्राप्त करुन घेऊन व रु. ५/- विलंब शुल्क निबंधकाकडे भरुन नोंदणी करता येते व प्रमाणपत्रही मिळू शकते. या नियमानुसार १ वर्षानंतर कालावधीचे बंधन नाही. याचा पुरावा म्हणून भारत सरकारचे दिनांक ५/९/१९८५ चे पत्र सोबत जोडले आहे. त्यानुसार दिनांक १/४/७० पूर्वीचे देखील जन्म-मृत्यु नोंदणी या घटनांची नोंद वरील प्रमाणे नियमाचे पालन करुन करण्यास हरकत नाही.

कृपया सर्व गट विकास अधिकारी व निबंधक जन्म-मृत्यु नगरपालिका/ महानगरपालिका / कन्टोन्मेंट बोर्ड यांना कळवून, त्यानुसार कार्यवाही करण्यास सांगावे. त्याच प्रमाणे आपल्या जिल्हयातील कार्यकारी दंडाधिकारी व संबंधितांना देखील या बाबत खुलासा पत्र पाठवावे. केलेल्या कार्यवाहीची प्रत या कार्यालयास पाठवावी.

स्वाक्षरीत/-
डॉ. शरदचंद्र वाघमारे
उपसंचालक, आरोग्य सेवा,
तथा उपमुख्य निबंधक जन्म-मृत्यु,
महाराष्ट्र राज्य, पुणे- ६

२।०।०